Vidyawarta®
International Multilingual Research Journal
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed Pin-431126 (Maharashtra)

UGC Approved Refereed Journal Jr.No.41012

# Certificate Of Publication

This is to certify that the review board of our research journal accepted the research paper/article titled जी.ए. कुलकर्णी यांच्या कथेतील स्त्रीविश्व of ~~Dr~~./Mr./~~Miss~~/Mrs. नरेंद्र ईश्वर घरत

It is peer reviewed and published in the Issue-28 Vol:-02 in the month of Dec. 2018.

Thank you for sending your valuable writing for Vidyawarta Journal

Indexed (IIJIF)
Impact Factor 5.131
Govt.of India, Trade Marks Registry Regd.No.2611690
ISSN-2319 9318

Editor in chief
Dr.Bapu G.Gholap

Scanned with CamScanner

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Jr.No.41012
UGC Approved Refereed Journal

# Vidya Warta®

International Multilingual Refereed Research Journal

Issue-28, Vol-02 Oct. to Dec.2018

Editor
Dr.Bapu G.Gholap

Scanned with CamScanner

# Index

01) Impact of Agriculture in Economic Development Through Trade & Industry ...
Dr. Umesh Gupta, Raipur ||11

02) Coordination between RBI and Governmnet, a need of present time
Dr. Manoj Kumar, Badaun ||13

03) Personality Difference between High and low performances Female Hoc...
Mr. J. S. Mehta, Sgr. ||16

04) Epidemiology of sickle cell disorder: The rural scenario(female) in Naigaon...
Sanap N. P., Dist. Nanded ||22

05) Female Career Consciousness and some psycho-social variables
Joshi H. C. & Joshi Rambha, Nainital Uttarakhand ||25

06) Comparative study of State Financial Corporations
Vartika Mulchandani ||32

07) PERENNIAL AGRARIAN CRISIS IN INDIA : CAUSES AND REMEDIES
Dr. Shashi Kant Tripathi & Dr. Mukesh Srivastava, Lucknow ||36

08) OPEN SOURCES LIBRARY MANAGEMENT SOFTWARE: AN OVERVIEW
Dipankar Halder, Kolkata ||41

09) NIRMALA SAINT BABA BHAG SINGH OF DERA SANTPURA (JABBAR)
Dr. SARLA NIRANKARI & Dr. C. R . SANGHA, JALANDHAR, PUNJAB ||45

10) CORPORATE GOVERNANCE IN INDIA: REFORMS AND CHALLENGES
Ajaybhai Arvindbhai Talpada, Anand ||51

11) POLITICAL DIMENSIONS AND IMPLICATIONS OF ARTICLE 370
Dr. D. K. P. Chaudhary & Muzaffar Hussain, Rudrapur (Uttarakhand) ||55

12) Development and Fabrication of Sliding Gate Control from Remote Location
Abhishek Gupta, Port Blair, A & N Islands ||61

13) A New Species of Genus Anarete (Diptera: Cecidomyiidae from Nanded, ...
Dr. K. A. Ahad Najam, Dist. Nanded ||66

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com



Scanned with CamScanner

14) Unraveling the path from Ideology to Being Occupational: Youth of Garo...
Manoda T. Sangma, Guwahati ||68

15) भटक्यांच्या स्वकथनातील सामाजिक वास्तव
प्रा. डॉ. ईश्वर सोमनाथे, जि. वर्धा (महाराष्ट्र) ||75

16) डॉ. पु. ग. सहस्त्रबुध्दे यांच्या साहित्यातील विज्ञानप्रणीत समाजरचना
प्रा. डॉ. भूषण आर. बंड, नागपूर ||77

17) संत तुकोबाराया : वारकरी संतपरंपरेतील मुकुटमणी
आनंद नरेंद्रकुमार इंगोले, वर्धा (महाराष्ट्र) ||80

18) अदिवासी साहित्य व्याप्ती, प्रेरणा
प्रा. केंद्रे सीता लक्ष्मणराव, जि. बीड ||83

19) अहमदनगर जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षण देणा—या यंत्रणा...
डॉ. अमरनाथ शांताराम कुमावत, अहमदनगर ||85

20) भारतातील जीएसटी कर प्रणाली
प्रा. डॉ संजय काशीनाथ मगर, जि. औरंगाबाद ||87

21) पर्यावरण शिक्षण शालेय विषय एक चिकित्सा
डॉ. बलीद यु. एस, औसा ||92

22) डॉ. भीमराव आंबेडकर यांचा मराठी साहित्यावरील प्रभाव
प्रा. डॉ. मारोती बालासाहेब भोसले, जि. परभणी ||94

23) जी. ए. कुलकर्णी यांच्या कथेतील स्त्रीविश्व
प्रा. नरेंद्र धरत, नागपूर ||98

24) पोलिसांच्या व्यक्तिमत्वाचा विश्लेपणात्मक अभ्यास (Analytical Study of Police's Per...
प्रा. डॉ. खलाणे शशिकांत हरी, धुळे ||101

25) कवीवर्य भ. श्री पंडिताची शिशुगीते
प्रा. कविता लुटे, नागपूर ||108

26) शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि गांधीजींची ग्रामस्वराज्याची कल्पना
प्रा. कल्पना निंबार्ते, भंडारा ||112




www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

Scanned with CamScanner

27) भारतातील लोकसंख्या वाढीच्या समस्यांचा अभ्यास
प्रा. एल. झेड. पाटील, जि. धुळे ||116

28) अलिप्त राष्ट्र परिषद आणि सद्य:स्थिती
प्रा.डॉ.संभाजी शामराव तनपुरे, जि.अहमदनगर ||118

29) य.गो. जोशी यांच्या लघुकथा
प्रा. डॉ. बाबाराव मारोती ठावरी, जि.गडचिरोली ||122

30) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जिवन आणि कार्य
डॉ. डोंगरे एल. बी., जि. नांदेड ||127

31) जयप्रकाश नारायण सर्वोदयी विचारवंत — एक अध्ययन
डॉ. राजेश्री एन. कडू, जि.नागपूर ||129

32) बहुआयमी व्यक्तिमत्व - यशवंतराव चव्हाण
प्रा. डॉ. श्रीमती कल्पना आहिरे, ओझर (मिग) ||132

33) आदिवासी समुदाय विकास : वनहक्क कायदा (२००६) आणि समाजकार्य मध्यस्थी
डॉ. गणेश आर. गाडेकर, यवतमाळ ||136

34) भक्ति का उद्‌भव —विकास एवं प्रमुख सम्प्रदाय
डॉ० सीमा शकुनि, डूँगरपुर ||141

35) भारतीय समाज और महिला सशक्तीकरण
प्रा. पी. टी. बाचेवाड, औरंगाबाद ||145

36) उत्तराखण्ड हिमालय (चार धाम) : प्राचीन तीर्थ यात्रा मार्ग एवं स्थित चट्टियाँ
डॉ० दीपक कुमार, (हरिद्वार) उत्तराखण्ड ||147

37) माध्यमिक और उच्चतर माध्यमिक विद्यालयों में कार्यरत नियमित एवं अतिथि ...
डॉ. ज्योति जैन ||155

38) नौवें दशक की कविता में नैतिक मूल्य
प्रा. डॉ. रमेश आडे, जि. उस्मानाबाद ||159

39) सौन्दर्य शास्त्र के सिध्दांत एवं भारतीय संगीत से सम्बन्ध: एक अध्ययन
Minal S. Gadve, Amravati, Maharastra ||161



www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

Scanned with CamScanner

40) साठोत्तरी हिन्दी साहित्य में महिला कहानीकारों की भूमिका
शिवानी मिश्रा, बरेली ||166

41) समकालीन हिंदी कथा साहित्य में वृध्द विमर्श
डॉ. सूर्यकांत शिंदे, सोनखेड ||168

42) ओमप्रकाश वाल्मीकि : व्यक्तित्व एवं कृतित्व
कु. भंडारे अनिता कृष्णा ||170

43) शासकीय एवं अशासकीय विद्यालयों में कार्यरत शिक्षकों की बुद्धिमता का अध्ययन
श्याम बिहारी ओझा & डॉ. (श्रीमती) कमलेश सिंह, ग्वालियर (म.प्र.) ||173

44) डॉ. सुशीला टाकभौरे कृत निबंध संग्रह 'परिवर्तन जरुरी' में व्यक्त दलित समाज एवं साहित्य
प्रा. पाटील सुखदेव रामा, सोनखेड ||178

45) उत्तरशती के हिंदी उपन्यासों में आदिवासी नारी
प्रा. डॉ. सुनीता कावळे, चालीसगाँव, जि. जलगाँव ||181

46) तानसेन और उनकी सांगीतिक उपलब्धियाँ
डॉ० (श्रीमती) निशा कुमारी, आज़मगढ ||184

www.vidyawarta.com/03 – http://www.printingarea.blogspot.com



Scanned with CamScanner

23

# जी. ए. कुलकर्णी यांच्या कथेतील स्त्रीविश्व

**प्रा. नरेंद्र घरत**
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय नागपूर

***********

१९६० च्या आसपास नवकथेच्या दुसऱ्या पिढीतील महत्त्वाचे कथाकार जी. ए. कुलकर्णी. त्यांचे 'निळासावळा', 'पारवा', 'हिरवेरावे', 'रक्तचंदन', 'काजळमाया', 'रमलखूणा', 'सांजशकून', 'पिंगळावेळ', 'कुसुमगुंजा' इ. कथासंग्रह प्रसिध्द झालेत. जी. एं. नी मराठी कथा अनेक मार्गांनी समृद्ध केली. रचना, व्यक्तिचित्रण, वातावरणनिर्मिती, जीवनचिंतन, कल्पनारम्यता आणि प्रतिमांनी लखलखीत केलेली ऐश्वर्यसंपन्न शैली यांनी मराठी कथेची अर्थवत्ता आणि वैभव टोकाला नेऊन पोहचवले. त्यांच्या कथा लेखनासंदर्भात म. द. हातकणंगलेकर म्हणतात, "जी. एं. ची कथासाधना विस्तारपूर्ण आणि परिश्रमांनी केलेली असते. एखादया प्राचीन भव्य मंदिराप्रमाणे त्यांच्या कथांची रचना असते. तिचा परिणाम विस्मयकारक होतो. त्यातून गूढ अस्तित्वतत्त्वाचा प्रवाह थरथरत वाहतो आणि तो आपला पिच्छा पुरवीत राहतो. त्यांच्या विनोदांतही विचित्र प्रतिमा आणि अस्वस्थ करणारा विचार असतो. मानवी दुःखाच्या शीलाखंडातून सघन कथा आकार घडवणारे जी. ए. हे मुलखावेगळे मराठी कथाकार आहेत."[१]

जी. ए. कुलकर्णी मानवी भावनांच्या सूक्ष्म संवेदना उलगडणारे एक मनस्वी व गूढ व्यक्तिमत्त्व. त्यांच्या कथेतील एक अनोखे, वास्तवाला भेदणारे सत्य, कारूण्य मनाला चटका लावून जाते. त्यात स्त्री पात्रांना विशेष स्थान आहे. म्हणूनच यांच्या कथातून अभिव्यक्त होणाऱ्या स्त्री व्यक्तिरेखांचा विचार करावा लागतो. आजच्या पुरूषप्रधान समाज व्यवस्थेत स्त्री ही वेगाने जात असली तरी कौटुंबिक जीवनात ती कायमच केंद्रस्थानी असते. पत्नी, आई, बहीण, आजी, सासू, सून, नणंद, भावजय अशा विविध भूमिका ती कर्तृत्वाने व प्रेमाने, निष्ठेने पार पाडत असते. शिवाय मैत्रीण, प्रेयसी—सखी या अनोख्या रूपांनीही ती आयुष्यात फुले सजवित असते. विविध स्त्री रूपे, त्या स्त्री रूपातून त्यांचे व्यक्तिमत्त्व, घरातील त्यांचे स्थान, भावबंध, नातेसंबंधातील दुःखद पीळ, विश्वासघात, आत्यंतिक जिव्हाळा व प्रेम, विविध स्वभावधर्म व वृत्ती—प्रवृत्तींचा अनुभव देणाऱ्या त्यांच्या कथेतील स्त्रिया दिसून येतात. हया स्त्रिया कधी शांत, सोशिक, कुटुंबवत्सल, पतिशी एकनिष्ठ, वात्सल्यरूपी आहेत तर कधी स्वार्थी, चंचल, व्यभिचारी सुध्दा आहेत. एकाकी व अबोलपणे नियतीचे आघात सहन करणारी, नियतिशी धाडसाने संघर्ष करणारी व समाजाशी झगडणारी अशा या स्त्री रूपांच्या कथा जी. एं. नी चत्रांकीत केलेल्या आहेत.

जी. ए. कुलकर्णी यांच्या 'रक्तचंदन' कथा संग्रहातील 'राधी' ही कथा. 'राधी' हे या कथेतील प्रमुख पात्र गोपाळभटशची राधी म्हणून ती गावात प्रसिध्द आहे. अजूनही ती आपल्या नवऱ्याची म्हणजे गोपाळभटृची वाट पाहतच आहे. गावातील लोक राधीला वाईट नजरेची म्हणून हिणावत असतात. ती गल्लीतून जात असतांना घरातील लोक दार बंद करतात. चुलीवरील दुध उतू जातयं कां म्हणून पाहतात. कारण राधीचा पायगुण चांगला नाही. वास्तविकतः राधी ही प्रेमळ आहे. परंतु समाजात वाईट नजरेची म्हणून तिला स्थान नाही. गणेशवाडी भटाचा मुलगा तात्या आणि गावातील चार—पाच निर्बुध्द, उर्मट मुलांनी राधीला वेडे केले जीव घेतला. 'राधी' या कथेत राधी केंद्रस्थानी आहे. गावातील तीचा व्यक्तिसंपर्क आणि हळूहळू तिच्याविषयीच्या गैरसमजातून राधीचे व्यक्तिमत्त्व समोर येत असते. डॉ. भालचंद्र नेमाडे म्हणतात, "तिचे आयुष्य म्हणजे एक —कोडेच—न सुटलेले! तिची नजर विषारी म्हणून सगळया गावाकडून तिची हेटाळणी! ती कुणालाच नको असते. गावाच्या एका बोळात कुत्र्यासारखे, कुत्र्याच्या सहवासात, कुत्र्याच्याच जातीचे मरण तिला येते."[२]

राधीच्या या अवस्थेला तिचे विनाधार जीवन



Scanned with CamScanner

आणि लोकांचे विचार कारणीभूत ठरतात. एक स्त्री म्हणून जगाने तीला नेहमी उपेक्षित ठेवले. तेच जी. एं. नी तिला आपल्या कथेत गौरविले.

'पारवा' या कथासंग्रहातील 'काकणे' ही पहिलीच कथा. या कथेत कौटुंबिक पार्श्वभूमी दिसून येते. सुंदर, मनाने स्वच्छ, कोवळया वयातल्या मुलीच्या नाजूक हातातील काकणांचा आवाज स्त्रीच्या अस्तित्वाची आणि तिच्या पावित्र्याची जाणीव करून देतो. कावेरी ही या कथेतील मुख्य पात्र. अशा स्वच्छ आणि सोज्वळ कावेरीला ओवळयाचा स्पर्श झाला. तोही रानरेडयासारख्या माजलेला, चांदीची अंगठी घालणाऱ्या मेरमीचा. त्याच्या कचाटयात ही अल्लाघरची गाय सापडली कशी ? तर निव्वळ शेणाच्या मोहाने. दिवस उजाडायच्या अगोदर गाडीतळावर पडणारे शेण गोळा करायला ती गेली आणि ती त्या नरपशूच्या बलात्काराला बळी पडली. हा देवाचा नैवद्य शेणावारी भ्रष्ट झाला. त्या बलात्काराने कावेरी जवळजवळ संपली. तिचे मन मलीन होवून शरीर जळू लागले. अशा वेळी तिच्या वाटयाला येतात सासूने केलेले तिचे लाड, नवऱ्याने दाखविलेली निळया साडीची रसिकता आणि काकणांचा तिला मिळालेला नजराणा पण तिच्या पावित्र्य विटंबनेनंतर कावेरीला हया जगाचा मोह उरला नाही. 'काकणे' विषयी वसंत आबाजी डहाके म्हणतात, "काकणे मध्ये एक बलात्कारीत स्त्री आत्महत्या करते एवढीच घटना आहे. परंतु अस्तित्त्वविषयक घृणा आणि व्यक्तिच्या सरळ साध्या जीवनावर पडणारी अशुभ काळी छाया यांनी ती कथा व्यापलेली आहे. हौस म्हणून नवऱ्याने आणलेल्या काकणांतला अर्थच पहाटेच्या काळोखात पिचलेल्या काकणांनी हिरावून घेतलेला असतो. जी कुणी व्यक्ती या अत्याचाराला कारण झालेली असेल तिला ही पर्वाही असत नाही की, आपण या हत्येला जबाबदार आहोत. या कथेतील कावेरीदेखील कमालीची एकाकी असते. जी. एं. ची बहुतेक पात्रे आतल्या आत दुःखी असतात, मूकतेने ते दुःख सहन करण्याचा प्रयत्न करतात आणि सोडून जातात तेव्हाही ती आपली दुःखे आपल्याशी घेवूनच."[३] अशी ही कावेरी आपला आकांत विहिरीत उडी देऊन संपविते. ज्यावेळी तिचा क्रूरतेने नाश केला जातो. त्यावेळी वाचक आतून हादरून जातात.

'कुसुमगुंजा' कथासंग्रहातील 'गाऱ्हाणे' या कथेत जी. एं. नी स्त्रीची मातृत्वाची इच्छा व तिच्या अपूर्णतेने समाजात तिला कमनशिबी समजल्या जाते. उचित सन्मान मिळत नाही, हे अधोरेखांकित करतांना दिसतात. या कथेतील रमाकांकूचे व्यक्तिमत्त्व असेच लक्षात राहण्याजोगे आहे. त्याचे बोलणे, चालणे, थट्टा करणे अगदी मोठया स्वरातच. म्हणूनच सगळया बायका तिच्यासाठी सख्या होत्या. परंतु तिच्या घरच्या अंगणात मात्र एका बाळगोपाळाची कमी होती. लोकांशी वागतांना, बोलतांना त्याचं दुःख दिसतं नाही. पण दवाखान्यात दमयंतीला बघायला त्या मधूसोबत गेल्या होत्या. तिथेच आधीच तीनं मुले असलेल्या ताराला आणखी दोन जुळे मुले झाल्याचे रमाकाकूला दिसते. तेव्हा नेहमी आनंदाने वावरणाऱ्या व मनसोक्त बोलणाऱ्या रमाकाकू एकदम शांत व गप्प होतात. रमाकाकूच्या मनात आपल्याला एक मुल असतं तर असा विचार स्पर्शून जातो व त्या मधुला म्हणतात, "आता बघ, तिथं पोर पाठवायच्या ऐवजी त्यातलं एक तरी जर आमच्या घरी आलं असतं तर काय बिघडलं असतं ....."[४] तिच्या या निरागस प्रश्नातून तिचं मातृत्वासाठी आसुसलेलं मनच व्यक्त होत असतांना दिसते.

'सांजशकुन' या कथासंग्रहातील 'पाणमाय' या कथेत कुटुंबासाठी झटणाऱ्या स्त्रीचे, गरीब कुटुंबाचे वर्णन आलेले आहे. वास्तव जीवनातील खरे स्वरूप व दृष्टांत घटकांचे मिश्रण त्यात आढळते. आपल्या घरादाराला, मुलाबाळांना, संपन्नता, सुखसोयी आनंद देणाऱ्या 'पाणमाय' कथेतील मुलं आपल्या आईला या ऐश्वर्यसुखाचे रहस्य सांगण्याचा आग्रह धरतात पण पाणमाय ते रहस्य सांगण्यास नकार देत असते. ते रहस्य सांगितले तर मी मरून जाईन, असे ती जेव्हा सांगते तेव्हा घरातील सर्वजण टिंगल—टवाळी करतात. पूर्वी असे काही सांगितल्यावर मुलं गप्प होत, घाबरून जात. परंतु लहान मुलगा तू मेली तरी चालेल असे जेव्हा म्हणतो तेव्हा ती हताश होते. तिला वाटते मुला — सुनांचे जाऊ देत पण आपला नवरा तरी आपली बाजू घेईल पण तो ओठ उसवल्याप्रमाणे हसतो आणि



Scanned with CamScanner

म्हणतो, "माझी काळजी करू नकोस तू, मला आता माझा काढा चांगला करून घेता येतो." हे ऐकूण तिचे अंग कडवट तिरस्काराने भरून येते. ज्याने कधीच संसार, मुलबाळं यांची जबाबदारी व काळजी केली नाही, कधी स्वाभिमानाचा आधार दिला नाही अश्या या नवऱ्याबद्दल तिच्या मनात आयुष्यभर दडवून ठेवलेला संताप उफाळून येतो. पण आयुष्यभर त्याच्यासोबत केलेल्या तडजोडीमुळे ती संताप आवरून धरते. या कथेतील स्त्री समृध्दी व गरज असेपर्यंत हवीशी वाटते. पण गरज संपल्यावर नकोशी वाटते, कुटुंबासाठी आयुष्यभर जीवाचा आटापीटा करून सुध्दा कुटुंबात तिच्याविषयी माया, ममता, जिव्हाळा नसल्यामुळे ती एकाकी बनते.

'हिरवे रावे' या कथासंग्रहातील 'राक्षस' ही कथा. 'गुणी' हे कथेतील मुख्य पात्र. ती लहान, निष्पाप, कोवळया मनाची अनाथ पोर आहे. शंकरू सोनार हा तिचा आजोबां. गुणी त्याच्या पळून गेलेल्या मुलीची मुलगी असल्याने तिच्याविषयी शंकरूच्या मनात पराकोटीचा द्वेष व तिरस्कार आहे. आपल्यावर सूड उगविण्यासाठी या कार्टीला येथे सोडून गेली अशी गुणीविषयी धारणा आहे. ती घरात आल्यापासून आपला धंदा बसला, अन्नानदशा झाली म्हणून तो तिला पांढऱ्या पायाची समजतो. तिला अद्दल घडविण्यासाठी तिच्या कोवळया हातावर तापलेल्या कात्रीने डाग देतो. परंतु ही वेदना गुणीला सहन न झाल्यामुळे त्याच्या हाताची बोटे काडकन चावते पण तिच्या चेहऱ्यावर प्रहार करून तिला शंकरू हाकलून देतो आणि म्हणतो, "आजपासून उलथ कुठतरी मी आल्यावर जर तू दिसलीस इथं, तर कातडी सोलून काढीन." (पृ.९९) गुणीला प्रेमाने, मायेने वागविणारे कुणीच नव्हते. जो आधार असतो तोही क्रूर वागतो. आधीच तिच्या वृत्तीत थोडी जाणवणारी विकृती उफाळून वर येते. शंकरूच्या गळयात कात्रीचे धारदार पाते खुपसून त्याला ठार मारून आपला राग शांत करते. गुणीच्या बालमनात आजोबा, सभोवतालची माणसे यात कुठेच ओलावा गवसला नाही. उलट राग, मत्सर, द्वेष, क्रूरता हेच तिला आढळले म्हणूनच शंकरूचा खून केला तरी त्याचे तिला काहीच वाईट वाटत नाही. जी. एं. च्या कथेतील बालजगताला वास्तवाचे चटके सहन करावे लागले तरी त्यांची मनं कोमेजून न जाता, हतबल न होता विपरीत परिस्थितीवर मात करून फुलण्याचा प्रयत्न करतात.

'शलॉट' ही अशीच अतिशय आशयगर्भ व, भावस्पर्शी कथा. शरीराने कुरूप असणारी काशी या कथेतील प्रमुख स्त्रीपात्र आहे. तिच्या आंतरिक इच्छा, आकांक्षा इतरांसारख्या आहेत, एक तिचेही जग आहे. पण बापाकडून तिचा नेहमीच छळ होत असतो. याचे कारण तिचे पाय सरडयासारखे आहेत आणि ती कुरूप आहे म्हणून लोकांचीही उपेक्षा तिला सहन करावी लागते. पण जी. ए. तिचे रेखाटन करतांना स्वतःच्या अस्तित्वाचा, असण्याचा विसर पडून बाहेरच्या जगात जे आपल्यासाठी नाहीच, याचा हव्यास धरणारी काशी रेखाटून तिला स्वतःची जाणिव करून देतात. आपण कुरूप आहोत, आपले पाय सरडयासारखे आहेत. ही काशीची जाणीव तिला खिन्न व एकटे करून टाकते. शेवटी मात्र बापाच्या छळाला कंटाळलेल्या काशीची बापाच्या मृत्यूनंतरच सुटका होते. एक दिवस सुटकेचा मार्ग तिला सापडतोच.

जी. एं. च्या वरील कथांबरोबरच 'रात्र झाली गोकुळी' मधील वारणाई, 'बळी' — जोगतीण, 'व्यथा' — राधाबाई, कालिंदी, 'शिक्षा' — शोभा नाईक, 'बाधा' — रमा, 'वस्त्र' — मेरी डिसोझा, 'प्रदक्षिणा' — शांताक्का अशा अनेक कथांतून जी. ए. स्त्री जातीच्या कथावेदना आणि महानता व्यक्त करतात. "दारिद्रय, अवहेलना, दुःख, यातना पराभूतता व एकाकीपणा, आत्मपीडन, परपीडनादी विकृती, भावनिक व लैंगिक उपासमार सोसतं ही माणसे जगत राहतात. जगण्याचा चिवट धागा चिकाटीने पुढे पुढे ओढत नेतात. स्वप्ने व स्वप्नभंग, सुखाभास व कटू धारदार वास्तव, भ्रम व भ्रमनिरास यांच्या द्वंद्वात त्यांची आयुष्ये कुस्करली जातात. पण तरीही ती जगत राहतात. वाकतात पण मोडून पडत नाहीत."[५] त्यामुळे वाचकाला पात्रांबद्दल आतडयाची माया वाटते. आपला कळवळा जी. ए. उघडपणे व्यक्त करीत नसले तरी कथेतून सामान्य जनतेतील पात्रांबद्दल एक खोल आणि गंभीर आत्मीयता सूचित करतात. मानवी अस्तित्वाचे स्वरूप दुःखमय आहे;



Scanned with CamScanner

मानवी जीवन शोकात्म आहे. हया तात्त्विक भूमिकेतून ते समस्यांकडे पाहतात. जी. ए. "जीवनाविषयी, माणसाच्या व्यथांविषयी तुच्छता दाखवित नाहीत. मानवी वेदनेवर फुंकर घालणारे माणूसकीच्या मूल्यांचा वेध घेणारे, गंभीरपणे जीवनदर्शन घडविणारे जी. ए. जीवनवादी मानवतावादी कलावंत होते."[६] जी. ए. आपल्याच कथांना विश्वात्मक आकार देतात. मानवी मूल्यांची कास धरून मानवाला केंद्र माणून त्यांची कथा आकाराला येत असते. जीवनाचे आशयगर्भ तत्त्वज्ञान जी. ए. आपल्या कथांमधून साकार करीत असतात. एका सखोल चिंतनातून कथेला व्यापक स्वरूप मिळते. म्हणूनच जी. ए. कुलकर्णी मराठी कथेच्या क्षेत्रातील श्रेष्ठ कथाकार ठरतात.

**संदर्भ :—**

१) संपा. कुलकर्णी, अ. अ, हातकणंगलेकर म. द, प्रदक्षिणा खंड—२ कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र: आ. १९९१, पश. ११६.

२) डॉ. फडके, भालचंद्र, सहा कथाकार, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, च. आ. २००२, पृ. ३४

३) डहाके, वसंत आबाजी, संपा. हातकणंगलेकर म. द., ललित — जी. ए. कुलकर्णी विशेषांक, फेब्रु — १९८९, पृ. २७

४) कुलकर्णी, जी. ए., कुसुमगुंजा, पाप्युलर प्रकाशन, मुंबई,पृष्ठ क्र. ७८

४) इनामदार, एस. डी, प्राक्तनाचे वेध, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. १९९८, पृ. ३७

५) कुल्ली, स. त्र्यं., आशयवेध, विजयप्रकाशन, नागपूर, प्र. आ. १९९७, पृ. १२१

24

# पोलिसांच्या व्यक्तिमत्वाचा विश्लेषणात्मक अभ्यास

## (Analytical Study of Police's Personality)

**प्रा. डॉ. खलाणे शशिकांत हरी**
जयहिंद शैक्षणिक संस्थेचे झेड.बी. पाटील महाविद्यालय
धुळे

**********

**प्रस्तावना (Introduction)**

महाराष्ट्र राज्यातील कायद्याची अंमलबजावणी करणारी एजन्सी म्हणून महाराष्ट्र पोलिसांची भूमिका महत्वाची आहे. संपूर्ण महाराष्ट्रात जवळपास १९५000 पुरूप पोलिस कर्मचारी तर १0५000 महिला पोलिस कर्मचारी कार्यरत आहेत. महाराष्ट्र राज्यात १0 पोलिस आयुक्त तर ३५ जिल्हा पोलिस युनिट कार्यरत आहेत. त्यापैकी धुळे जिल्हयात एक पोलिस युनिट असून त्यात एकूण १७ पोलिस स्टेशन येतात. धुळे जिल्हा युनिट मध्ये १८१६ पोलिस कर्मचारी कार्यरत आहेत. संपूर्ण महाराष्ट्र राज्यभर पोलिसांचे सेवांतर्गत प्रशिक्षण वर्ग सुरू असून त्यात व्यक्तिमत्व विकास व ध्यानधारणा या दोन महत्वपूर्ण विपयांचा समावेश करण्यात आलेला आहे.

समाजातील सुरक्षाव्यवस्थेचा कणा म्हणून पोलिस यंत्रणेकडे पाहिले जाते. इंग्रजांच्या राजवटीत दर हजार लोकसंख्येमागे एक पोलिस असे समिकरण होते. स्वातंज्योत्तर भारतात हे समिकरण केव्हाच बारगळले. त्यामुळे पोलिसांवर अतिरिक्त कामाचा वोजा वाढल्याचे निदर्शनास येते. डयुटीच्या अनियमित वेळा, रात्र दिवसपाळी, सणउत्सव, मतदान प्रक्रिया दंगे मोर्चा या प्रसंगी अतिरिक्त कामाचा ताण, सतत नकारात्मक परिस्थितीचा सामना, कामाचा मोबदला कमी असणे अधिका-यांचे दडपण, कुटूंबाला पूरेसा वेळ देता न येणे व इतर वैयक्तिक कारणे या सर्व गोप्टींचा पोलिसांच्या जीवनशैलीवर परिणाम होवून त्यांचा व्यक्तिमत्वावर निश्चितच प्रभाव पडतो. या सर्व बाबींचा परिणाम म्हणून चिंता, ताणतणाव, नैराश्य, उदिग्नता, सततचे आजारपण, कामचुकार वृत्ती मद्यपान व



Scanned with CamScanner